# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## जाहीरात क्र. ०१/२०१९ :- सरळसेवा भरती - घटकसंवर्ग

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खाली नमुद केल्याप्रमाणे शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या जिल्हयांतील चालक तथा वाहक या पदाकरीता अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. **अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.**

**उमेदवाराने अर्ज भरण्यापूर्वी सदर जाहिरातीत देण्यात आलेली माहिती, सूचना, अटी व शर्ती इ. काळजीपूर्वक वाचाव्यात.**

### (१) चालक तथा वाहक पदाकरीता भरावयाच्या पदांची सामाजिक व समांतर आरक्षणानुसार संख्या.

#### (१) औरंगाबाद विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | **भरावयाची पदसंख्या** | ३१ | १७ | ०७ | ०६ | ०८ | ०५ | ०५ | ४६ | ३८ | ७७ | २४० |
| २ | महिला ३०% | ०९ | ०५ | ०२ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १४ | ११ | २३ | ७३ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०५ | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०६ | ११ | ३८ |
| ४ | अंशकालीन १०% | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०५ | ०४ | ०८ | २५ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | ११ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०५ |
| ७ | खेळाडू ५% | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | ११ |
| ८ | इतर | ०९ | ०५ | ०२ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १५ | १२ | २५ | ७७ |
| | एकुण | ३१ | १७ | ०७ | ०६ | ०८ | ०५ | ०५ | ४६ | ३८ | ७७ | **२४०** |

#### (२) जालना विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | **भरावयाची पदसंख्या** | २८ | २७ | ०० | ०८ | ०२ | ०० | ०४ | ४५ | ३६ | ७६ | २२६ |
| २ | महिला ३०% | ०८ | ०८ | ०० | ०२ | ०१ | ०० | ०१ | १४ | ११ | २३ | ६८ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०४ | ०४ | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०७ | ०५ | ११ | ३३ |
| ४ | अंशकालीन १०% | ०३ | ०३ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०४ | ०४ | ०८ | २३ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | १० |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०३ |
| ७ | खेळाडू ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | १० |
| ८ | इतर | ११ | १० | ०० | ०४ | ०१ | ०० | ०२ | १६ | ११ | २४ | ७९ |
| | **एकुण** | २८ | २७ | ०० | ०८ | ०२ | ०० | ०४ | ४५ | ३६ | ७६ | **२२६** |

## (३) परभणी विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | २६ | १४ | ०६ | ०५ | ०७ | ०४ | ०४ | ३९ | ३२ | ६६ | २०३ |
| २ | महिला ३०% | ०८ | ०४ | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | १२ | १० | २० | ६२ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०५ | १० | ३२ |
| ४ | अंशकालीन १०% | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०४ | ०३ | ०७ | २१ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०३ | ०९ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०४ |
| ७ | खेळाडू ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०३ | ०९ |
| ८ | इतर | ०८ | ०५ | ०२ | ०१ | ०३ | ०२ | ०२ | १२ | ०९ | २२ | ६६ |
| | एकुण | २६ | १४ | ०६ | ०५ | ०७ | ०४ | ०४ | ३९ | ३२ | ६६ | २०३ |

## (४) अमरावती विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | ३९ | ०४ | ०९ | ०० | ०६ | ०७ | ०० | २४ | ३७ | १०४ | २३० |
| २ | महिला ३०% | १२ | ०१ | ०३ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०७ | ११ | ३१ | ६९ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०६ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०४ | ०६ | १६ | ३६ |
| ४ | अंशकालीन १०% | ०४ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०४ | १० | २३ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०५ | १० |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| ७ | खेळाडू ५% | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०५ | १० |
| ८ | इतर | १२ | ०२ | ०४ | ०० | ०२ | ०३ | ०० | ०९ | ११ | ३५ | ७८ |
| | एकुण | ३९ | ०४ | ०९ | ०० | ०६ | ०७ | ०० | २४ | ३७ | १०४ | २३० |

## (५) अकोला विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०५ | ११ | ३३ |
| २ | महिला ३०% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०३ | ०७ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०५ |
| ४ | अंशकालीन १०% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०२ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ७ | खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ८ | इतर | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०३ | ०४ | १८ |
| | एकुण | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०५ | ११ | ३३ |

## (६) बुलडाणा विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | ६१ | ३३ | १४ | १२ | १७ | ०९ | ०९ | ९० | ७६ | १५१ | ४७२ |
| २ | महिला ३०% | १८ | १० | ०४ | ०३ | ०५ | ०३ | ०३ | २७ | २३ | ४५ | १४१ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०९ | ०४ | ०२ | ०२ | ०३ | ०१ | ०१ | १४ | १२ | २३ | ७१ |
| ४ | अंशकालीन १०% | ०६ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | १० | ०८ | १५ | ४७ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०३ | ०७ | २४ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०२ | ०३ | १० |
| ७ | खेळाडू ५% | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०३ | ०७ | २४ |
| ८ | इतर | २१ | ११ | ०५ | ०४ | ०५ | ०२ | ०२ | २९ | २५ | ५१ | १५५ |
| | एकुण | ६१ | ३३ | १४ | १२ | १७ | ०९ | ०९ | ९० | ७६ | १५१ | ४७२ |

## (७) यवतमाळ विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | १९ | २४ | ०५ | ०४ | ०६ | ०३ | ०३ | २४ | २७ | ५६ | १७१ |
| २ | महिला ३०% | ०६ | ०७ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०७ | ०८ | १६ | ५१ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०३ | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०४ | ०६ | २६ |
| ४ | अंशकालीन १०% | ०२ | ०२ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०३ | ०७ | १७ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०५ | ०९ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०३ |
| ७ | खेळाडू ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०५ | ०९ |
| ८ | इतर | ०६ | ०८ | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०८ | ०९ | १७ | ५६ |
| | एकुण | १९ | २४ | ०५ | ०४ | ०६ | ०३ | ०३ | २४ | २७ | ५६ | १७१ |

## (८) धुळे विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | ११ | ९४ | ३७ | ० | २० | २३ | ० | ० | १३ | ७० | २६८ |
| २ | महिला ३०% | ३ | २८ | ११ | ० | ६ | ७ | ० | ० | ४ | २१ | ८० |
| ३ | माजी सैनिक १५% | २ | १४ | ५ | ० | ३ | ४ | ० | ० | २ | १० | ४० |
| ४ | अंशकालीन १०% | १ | ९ | ४ | ० | २ | २ | ० | ० | १ | ७ | २६ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | १ | ५ | २ | ० | १ | १ | ० | ० | १ | ४ | १५ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ० | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ४ |
| ७ | खेळाडू ५% | ० | ५ | २ | ० | १ | १ | ० | ० | १ | ४ | १४ |
| ८ | इतर | ४ | ३१ | १२ | ० | ७ | ८ | ० | ० | ४ | २३ | ८९ |
| | एकुण | ११ | ९४ | ३७ | ० | २० | २३ | ० | ० | १३ | ७० | २६८ |

## (९) जळगाव विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | २९ | ० | ० | ४ | ५ | ३ | ० | ४२ | ३६ | १०४ | २२३ |
| २ | महिला ३०% | ९ | ० | ० | १ | २ | १ | ० | १३ | ११ | ३० | ६७ |
| ३ | माजी सैनिक १५% | ४ | ० | ० | १ | १ | ० | ० | ६ | ५ | १६ | ३३ |
| ४ | अंशकालीन १०% | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ | ११ | २२ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ६ | ११ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ४ |
| ७ | खेळाडू ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ६ | ११ |
| ८ | इतर | १० | ० | ० | २ | २ | २ | ० | १४ | ११ | ३४ | ७५ |
| | एकुण | २९ | ० | ० | ४ | ५ | ३ | ० | ४२ | ३६ | १०४ | २२३ |

## (१०) नाशिक विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | ०९ | २५ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | ०२ | १० | ०९ | ४५ | ११२ |
| २ | महिला ३०% | ०३ | ०७ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०३ | १३ | ३४ |
| ३ | माजी सैनिक १५% | ०१ | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०७ | १७ |
| ४ | अंशकालीन १०% | ०१ | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०५ | ११ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| ७ | खेळाडू ५% | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०६ |
| ८ | इतर | ०२ | ०८ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०२ | १६ | ३६ |
| | एकुण | ०९ | २५ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | ०२ | १० | ०९ | ४५ | ११२ |

## (११) पुणे विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | भरावयाची पदसंख्या | २४० | १०१ | ६१ | ६६ | ३१ | ४५ | ४४ | ४२८ | १०१ | ५३० | १६४७ |
| २ | महिला ३०% | ७२ | ३० | १८ | २० | ०९ | १४ | १३ | १२८ | ३० | १५९ | ४९३ |
| ३ | माजी सैनिक १५% | ३६ | १५ | ०९ | १० | ०५ | ०७ | ०६ | ६४ | १५ | ८० | २४७ |
| ४ | अंशकालीन १०% | २४ | १० | ०६ | ०७ | ०३ | ०५ | ०४ | ४३ | १० | ५३ | १६५ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | १२ | ०५ | ०३ | ०३ | ०२ | ०२ | ०२ | २१ | ०५ | २७ | ८२ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०५ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०८ | ०२ | ११ | ३३ |
| ७ | खेळाडू ५% | १२ | ०५ | ०३ | ०३ | ०२ | ०२ | ०२ | २१ | ०५ | २७ | ८२ |
| ८ | इतर | ७९ | ३४ | २१ | २२ | ०९ | १४ | १६ | १४३ | ३४ | १७३ | ५४५ |
| | एकुण | २४० | १०१ | ६१ | ६६ | ३१ | ४५ | ४४ | ४२८ | १०१ | ५३० | १६४७ |

## (१२) सोलापूर विभाग

| अ.क्र. | तपशील समांतर आरक्षण | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | सा व शैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| १ | **भरावयाची पदसंख्या** | ७७ | ४१ | १८ | १५ | २१ | १२ | १२ | ११२ | ९४ | १८९ | ५९१ |
| २ | महिला ३०% | २३ | १२ | ०५ | ०५ | ०६ | ०४ | ०४ | ३४ | २८ | ५७ | १७८ |
| ३ | माजी सैनिक १५% | १२ | ०६ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १७ | १४ | २८ | ८९ |
| ४ | अंशकालीन १०% | ०८ | ०४ | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ११ | ०९ | १९ | ५९ |
| ५ | प्रकल्पग्रस्त ५% | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०५ | ०९ | ३१ |
| ६ | भुकंपग्रस्त २% | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | ११ |
| ७ | खेळाडू ५% | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०५ | ०९ | ३१ |
| ८ | इतर | २४ | १४ | ०६ | ०४ | ०८ | ०३ | ०३ | ३६ | ३१ | ६३ | १९२ |
| | **एकुण** | ७७ | ४१ | १८ | १५ | २१ | १२ | १२ | ११२ | ९४ | १८९ | ५९१ |

**( टिप :- केंद्र सरकारने आर्थिक दुर्बलांना दिलेल्या १०% आरक्षणा संदर्भात राज्य शासन जे आदेश निर्गमित करील ते प्रस्तुत प्रकरणी लागू राहतील.)**

( २) समांतर आरक्षण :-

(अ) महिलांसाठी आरक्षण:- शासन नियमानुसार एकूण पदाच्या ३० टक्के इतके समांतर आरक्षण आहे.

(ब) माजी सैनिक आरक्षण:- शासन नियमानुसार एकूण पदांच्या १५ टक्के इतके समांतर आरक्षण आहे.

(क) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त:- शासन निर्णयानुसार एकूण पदांच्या ७ टक्के इतके समांतर आरक्षण आहे. (भुकंपग्रस्त २ टक्के व प्रकल्पग्रस्त ५ टक्के )

(ड) खेळाडू आरक्षण:- राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंकरीता ५ टक्के आरक्षण आहे.

(इ) शासन सेवेतील अंशकालीन कर्मचारी:- शासन निर्णयानुसार १० टक्के इतके समांतर आरक्षण आहे.

(ई) अनाथ मुलांकरीता आरक्षण :- शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग व शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.संकीर्ण ११८ क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२ / का-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ नुसार अनाथ मुलांकरीता खुल्या प्रवर्गातून १ टक्का समांतर आरक्षण आहे.

उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधुन भरण्यात येतील तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून खुला प्रवर्ग वगळता ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातुन भरण्यात येते.

(३) **संबंधित चालक तथा वाहक पदासाठी विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव / शारिरीक पात्रता/ वयोमर्यादा इत्यादींचा तपशील**

१) वेतनश्रेणी :- रु.१२०८० - २६६७३/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, किमान एकत्रित वेतन रु.१४५१३/- .

२) शैक्षणिक अर्हता :-

(अ) इयत्ता १० वी (एस.एस.सी.) उत्तीर्ण.

(ब) मराठी भाषेमध्ये लिहिता वाचता येणे आवश्यक.

(क) प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ.) यांचेकडील अवजड वाहन चालविण्याचा वैध परवाना व पी.एस.व्ही.बॅज (बिल्ला ) आवश्यक.

(ड) प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ.) यांचेकडील वाहकाचा वैध परवाना व बॅज (बिल्ला ) नियुक्तीपुर्वी सादर करणे आवश्यक राहील.

३) अनुभव :- सर्व प्रकारची अवजड वाहने विशेषत: डिझेलवरील अवजड वाहन (ट्रक, प्रवासी बस ) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा विना अपघात अनुभव असणे आवश्यक आहे. अवजड वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्याच्या तारखेपासून पुढील ३ वर्षाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्या अगोदरच्या अनुभवाचा दाखला ग्राहय धरला जाणार नाही. अनुभवाचा दाखला ट्रक मालक व स्थानिक लोकप्रतिनिधी / राजपत्रित अधिकारी यांच्या स्वाक्षरीसह उपरोक्त संकेतस्थळावर जाहीरातीसोबत दिलेल्या विहित नमुन्यात असणे आवश्यक आहे.सदर दाखला निवडपूर्व कागदपत्रांच्या तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

४) शारिरीक पात्रता :- (अ) ऊंची किमान १६० सें.मी. व कमाल १८० से.मी.

(ब) दृष्टी - चष्म्याविना ६ X ६ ( चष्माविरहीत दृष्टी ) असणे आवश्यक.

(क) रंगआंधळेपणा किंवा रातांधळेपणा हा दोष असल्यास अपात्र.

५) वयोमर्यादा :- **दिनांक १४ जानेवारी,२०१९ रोजी** उमेदवाराचे वय २४ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे. शासन सेवेतील पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. रा.प.कर्मचा-यास कमाल वयोमर्यादेची अट लागु राहणार नाही.

६) चालक तथा वाहक पदातील उमेदवाराने वाहकाचा परवाना व बॅच वगळून वरील सर्व अर्हता, **दिनांक १४ जानेवारी, २०१९** रोजी पुर्ण करणे आवश्यक राहील.

(४) **भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष : ---**

| अ. क्र. | पद | वस्तुनिष्ठ लेखी परीक्षेसाठी गुण व उत्तीर्ण होण्यासाठी किमान आवश्यक गुण | वाहन चालन चाचणी/ व्यवसाय चाचणी गुण व उत्तीर्ण होण्यासाठी किमान आवश्यक गुण. | अंतिम निवडीसाठी निकष शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-१११८/प्र.क्र.-३९/ १६-अ दिनांक १९ डिसेंबर २०१८ वर आधारित. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | चालक तथा वाहक | १०० गुणांची ऑफ - लाईन लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br>उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्यांपर्यंत शिथिलक्षम. | चालक तथा वाहक पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी लेखी परीक्षेमध्ये खुल्या प्रवर्गातील ३५ व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले आणि मागासवर्गीय प्रवर्गासाठी ३० व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांना चालक तथा वाहक पदाच्या कागदपत्र छाननीसाठी बोलाविण्यात येईल व छाननीमध्ये पात्र आढळल्यास सर्व उमेदवारांना वाहन चालन चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. २५ गुणांची वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी -पुणे येथील संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर घेण्यात येईल.उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक चाचणी प्रकारात किमान ५० टक्के गुण आवश्यक. | लेखी परीक्षेमधील गुणांवर ४० टक्के भारांक, वाहन चालन चाचणी मधील गुणांवर ६० टक्के भारांक या एकत्रित भारांकानुसार मुलाखत न घेता जात प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल. |

(५) **उमेदवारांची निवड व नेमणूक :---**

**(अ)** लेखी परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

लेखी परीक्षेत एकूण ५० प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाकरीता २ गुण याप्रमाणे एकूण १०० गुणांसाठीच्या परीक्षेचा कालावधी दिड तासाचा ( १ तास ३० मिनिटे ) राहील. लेखी परीक्षेच्या प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे असतील, त्यापैकी एक पर्याय निवडावा लागेल.

**(ब)** (१) चालक तथा वाहक पदातील ४८ दिवसांचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना चालक तथा वाहक पदावर नेमणूक देण्यात येईल. या कालावधीमध्ये मूळ वेतनासह नियमानुसार अनुज्ञेय असलेले भत्ते मिळतील.

(२) लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम विषय ,गुण व कालावधी

| क्र. | पदाचे नांव | अभ्यासक्रम | विषय व गुण | | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | चालक तथा वाहक | वाहन चालन कौशल्याची स्वतंत्र वाहन चालन चाचणी घेण्यात येणार येत असल्याने प्रश्नपत्रिकेचा दर्जा सामान्य राहील. वाहतुक चिन्हे, नियम, सुरक्षित वाहतुक, वाहतुक नियम. मराठी व इंग्रजी भाषा, सामान्यज्ञान व अंकगणित | १) मराठी | २५ | १ $^{१}/_{२}$ तास |
| | | | २) इंग्रजी | २५ | |
| | | | ३) सामान्य ज्ञान | २५ | |
| | | | ४) अंकगणित | २५ | |
| | | | एकूण - | १०० | |

(क) लेखी परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम लावताना दुष्काळग्रस्त जिल्हयांतील उमेदवारांना प्रथम प्राधान्य दिल्यानंतर, शासन पुरक पत्र सा.प्र.वि.क्र.:प्रातिमं - १२१७ / (प्र.क्र.९२/१७) / १३ - अ, दिनांक ०२ डिसेंबर २०१७ व शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एससीवाय-२०१८ / प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३.१०.२०१८ नुसार विहीत केलेल्या निकषांनुसार क्रमवार लावला जाईल.

(ड) आवश्यकतेनुसार उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधी समाधानकारक पूर्ण न केल्यास पुढील नेमणूका नाकारण्याचा रा.प. महामंडळास अधिकार राहील

(इ) **चालक तथा वाहक पदाच्या** निवड यादीवरील उमेदवारांव्यतिरिक्त प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत राबावयाच्या शहर वाहतूक योजनेसाठी रु.१५०००/- [ रुपये पंधरा हजार मात्र ] इतक्या ठोक रक्कमेवर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती स्विकारण्याचा विकल्प राहील.

(ई) बीड, लातूर, नांदेड व उस्मानाबाद या चार जिल्हयांतील उमेदवारांनी इतर विभागात अर्ज केला व त्यांची तेथे निवड झाली, तर त्या उमदेवारांची या चार जिल्हयात भविष्यात जागा रिक्त झाल्यानंतर प्राधान्याने विनंती बदली करण्यात येईल.

(६) महत्वाच्या सूचना:---

१. उमेदवारांना लेखी परीक्षेची तारीख,वेळ व ठिकाण इत्यादींबाबतची माहिती लघुसंदेश (SMS) व ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.
२. लेखी परीक्षेतील गुणानुक्रम व सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन, प्राथमिक छाननीकरीता (कागदपत्र पडताळणी) पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महामंडळाच्या **msrtc.gov.in** व **msrtcexam.in** या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येतील.
३. उपरोक्त पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शारिरीक पात्रता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या केवळ गुणांच्या आधारे उमेदवारांला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवार उपरोक्त निवडीच्या निकषांनुसार पात्र ठरत असल्यासच गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड केली जाईल.

४. उमेदवार अर्ज केलेल्या पदासाठीची विहित अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याचा/ तिचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.

५. "जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र" या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तर त्याचा तपशील अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. तसेच, वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

६. शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदाकरीता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र (No objection Certificate) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. रा.प.महामंडळात समकक्ष पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-याची चालक तथा वाहक पदाकरीता निवड झाल्यास, त्याची सेवा व वेतन संरक्षित केले जाणार नाही.

७. जाहिरातीत नमुद केलेल्या पदासाठी आवश्यक असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती **msrtc.gov.in व msrtcexam.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

८. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज बाद ठरला तर, तसेच इतर कोणत्याही कारणास्तव उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा नियुक्तीसाठी अनर्हता ठरेल, अशी कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी (Mobile) अथवा संपर्काची अन्य साधने वापरण्यास मनाई आहे.

१०. शासन निर्णय, शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रि.युसे-२, दि.३० एप्रिल, २००५, दि.२१ ऑगस्ट, २००८ व दि.०१ जुलै, २०१६ मधील तरतुदीनुसार तसेच सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या खेळातील गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्याची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

११. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या - त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतर परिवर्तनीय आहे.

१२. अ) इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग [मराठा आरक्षण]या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी व प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी) वैध (Valid) असलेले सादर करणे आवश्यक आहे.

ब) विमुक्त जाती व भटक्या जमाती, विमाप्र, इमाव, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग [मराठा आरक्षण] आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध (Valid) प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी व प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी)सादर करणे आवश्यक आहे.

क) महाराष्ट्र शासनाने सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता [मराठा आरक्षण] १६% आरक्षण लागू केलेले आहे व सदर आरक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या अटी व शर्तींच्या अधीन अर्ज करणे आवश्यक असून सदर उमेदवार सामाजिक, शैक्षणिक मागासप्रवर्गात मोडत असतील त्याचा उल्लेख ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांनी सामाजिक, शैक्षणिक मागासप्रवर्गामध्ये [मराठा आरक्षण] मोडत असल्याचा जातीचा दाखला तसेच सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध (Valid)प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) व त्या अनुषंगाने इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी व प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी)सादर करणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गात [मराठा आरक्षण] निवड झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत मराठा आरक्षणासंबंधी मा. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर, सदर आरक्षणानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना महामंडळाच्या सेवेत सामावून घेणे शक्य नसल्यास त्यांना औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन अंतर्गत चालविण्यात येणा-या शहर बस वाहतुकीकरीता रु.१५,०००/- इतक्या ठोक रकमेवर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याचा विकल्प उपलब्ध राहील.**

ड) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असुन, ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

१३. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण १११८/ प्र.क्र.३९ / १६- अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ नुसार जात पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधीत उमेदवाराची जबाबदारी राहील.

१४. लेखी परीक्षेतील गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारिरीक अर्हता तपासणी) कागदपत्र तपासणी करताना शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, समांतर आरक्षणासंबंधी, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना-हरकत प्रमाणपत्र, लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र (अनाथ उमेदवार खेरीज करुन), चालक तथा वाहक पदासाठी, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ.) यांचेकडील सार्वजनिक अवजड वाहन चालविण्याचा वैध परवाना व पी.एस.व्ही.बॅज (बिल्ला) व विहीत नमुन्यामधील अनुभवाचा दाखला तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी संबंधीत पदाच्या अर्हतेनुसार उमेदवारास लागू असणा-या दाखल्यांच्या मूळ व स्वसाक्षांकित प्रती (Self attested copies)सादर करणे आवश्यक राहील.

१५. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलू शकते. **जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या जागा विभागातील भविष्यातील निकड लक्षात घेऊन दर्शविण्यात आलेल्या आहेत.** निवड झालेल्या उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व जागांच्या उपलब्धतेनुसार नेमणूका देण्यात येतील.

१६. सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

१७. चालक तथा वाहक पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारास कर्तव्य पार पाडण्यास प्रतिकूल ठरतील असे कोणतेही शारिरीक अवयव असल्याचे उघड झाल्यास किंवा कोणतेही शारिरीक व्यंग (Deformity) असल्यास, असा उमेदवार चालक तथा वाहक पदाच्या नेमणूकीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

१८. वर नमुद केलेल्या पदांची लेखी परीक्षा झाल्यानंतर प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. याबाबत उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळावर तपासणी करणे आवश्यक आहे. उत्तरतालिकेसंदर्भात काही आक्षेप असल्यास त्याबाबत संकेतस्थळावर विहीत केलेल्या कालावधीमध्ये त्याचे निरसन करण्यात येईल. विहीत कालावधीनंतर संकेतस्थळावर अथवा लेखी स्वरुपात आलेल्या कोणत्याही तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१९. निवड झालेल्या चालक तथा वाहक उमेदवारांची नियुक्ती जिल्हानिहाय असल्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना अन्य कोणत्याही विभागामध्ये त्यांच्या विनंतीनुसार कोणत्याही परिस्थितीत बदली दिली जाणार नाही. तसेच कोणत्याही कारणास्तव त्यांचे विभागातून अन्य विभागात बदलीसाठी अर्ज सादर केल्यास, ते स्विकारले जाणार नाहीत, तसेच निवड झालेले कर्मचारी मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.८९८७/२०१८ मध्ये दि.१२ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कोणत्याही लोकप्रतिनिधीकडून किंवा कोणत्याही श्रमिक संघटनेमार्फत अथवा इतर कोणाहीमार्फत बदलीसाठी शिफारसपत्र व दबाव आणणार नाहीत, तसेच भविष्यात बदलीसाठी दबाब आणल्यास रा.प.च्या नियमानुसार शिस्त व अपिल कार्यपध्दतीनुसार बडतर्फीसाठी पात्र राहील. याबाबतचे रु.१००/- च्या मुद्रांक कागदावरील [ स्टॅम्प पेपरवर ] शपथपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे बंधनकारक असेल. तथापी, शपथपत्र सादर केल्यानंतरही विनंती बदलीकरीता अर्ज सादर केल्यास किंवा अन्य मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा कर्मचा-यांनी बदलीकरीता सादर केलेला अर्ज हा त्यांचा राजिनामा समजून त्यानुसार त्यांना सेवामुक्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२०. उमेदवारांच्या मदत व माहितीकरीता हेल्पडेस्क दुरध्वनी क्रमांक १८०० १२१ ८४१४ याप्रमाणे आहे.

२१. उमेदवाराने निवडीनंतर कागदपत्र तपासणीच्या वेळी अर्जासोबत लहान कुटूंबाची माहिती भरणे (अनाथ उमेदवार खेरीज करुन) अनिवार्य राहील.

## (६) <u>ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना</u> :---

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) चलन प्रिंटसहीत करण्याचा कालावधी | १७.०१.२०१९ | ०८.०२.२०१९ रोजी रात्रौ ११.५९ पर्यंत. |
| २. | ऑनलाईन पेमेंट डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड नेट बँकींगद्वारे स्विकारण्याचा कालावधी | १८.०१.२०१९ | ०८.०२.२०१९ |
| ३. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये परिक्षा प्रक्रिया शुल्क स्विकृतीचा कालावधी | २१.०१.२०१९ | ११.०२.२०१९ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत. |
| ४. | अर्जामध्ये दुरुस्तीसाठीचा कालावधी<br>या कालावधीत अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी उमेदवारास एकदाच संधी देण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अर्जामध्ये दुरुस्ती करु शकतो. (याबाबत सविस्तर सुचना या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध होतील.) | १२.०२.२०१९ ते १५.०२.२०१९ रोजी रात्रौ ११.५९ वाजेपर्यंत. | |

*अर्ज नोंदणी केल्यानंतर दुस-या दिवशी बँकेमध्ये चलनाद्वारे भरती प्रक्रिया शुल्क भरावे.

**<u>भरती प्रक्रिया शुल्क</u>** : जाहिरातीत नमुद केलेल्या **चालक तथा वाहक** पदांसाठी भरती प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे. सदरचे शुल्क खुल्या प्रवर्गाकरीता रु.६००/- व मागास प्रवर्गातील उमेदवार तसेच महाराष्ट्रातील दुष्काळ ग्रस्त भागातील उमेदवारांना रु.३००/- असे राहील. तसेच बँकेचा आकार (बँक चार्जेस) उमेदवाराने स्वत: भरावयाचा आहे.

- **उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता खालील नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी खालील नमूद केलेले प्रमुख टप्पे आहेत.

१) प्राथमिक माहिती नोंदविणे.

२) मुख्यपृष्ठ

३) प्रोफाईल

४) अर्ज भरा.

    १) वैयक्तिक माहिती

    २) इतर माहिती

    ३) पदे निवडा

    ४) फोटो व स्वाक्षरी

    ५) पुष्टीकरण (Confirm)

    ६) भरणा.

        १) बँक चलन प्रिंट करणे.

        २) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत परिक्षा प्रक्रिया शुल्क भरुन (Transaction ID) मिळविणे.

नविन नोंदणी करण्यासाठी उमेदवाराने www.msrtcexam.in या संकेतस्थळावर क्लिक करावे. (हे संकेतस्थळ Chrome ५२ आणि वरील किंवा Mozilla Firefox ४७ आणि वरील किंवा Microsoft Internet Explorer ११ आणि वरील श्रेणीमध्ये अनुकूल आहे. आपण Chrome, Mozilla Firefox किंवा Microsoft Internet Explorer याची जूनी आवृत्ती असेल तर आपल्या ब्राऊजर श्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक राहील.

**<u>प्राथमिक माहिती नोंदविणे.</u>**

प्राथमिक माहिती नोंदविण्यासाठी या पृष्ठावर असलेले "नविन नोंदणी करा" हे बटण क्लिक करा. प्राथमिक माहिती नोंदणीच्या पृष्ठावर सर्व माहिती इंग्लिश कॅपिटल लेटर्समध्ये भरा. या पृष्ठावर आपल्याला संपूर्ण नाव, जन्म दिनांक, लिंग, पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादि माहिती भरावी लागेल व भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर "(Submit)" हे बटण क्लिक करा.

अर्जदाराने नोंद केलेल्या ई-मेल आयडीवर नोंदणी क्रमांक व पासवर्डचा मेसेज लगेचच येईल व आपणाला अर्जाच्या मुख्य पृष्ठावर नेले जाईल. प्रथमच लॉगीन केल्यावर अर्जदाराला आपला पासवर्ड बदलण्यासाठी तरतूद केलेली आहे.

**<u>सूचना</u>** :- अर्जदाराने एकदा अर्ज करण्यासाठी रजिस्टर केलेला ई-मेल आयडी पुन्हा दुसरा अर्ज भरण्यासाठी वापरु शकत नाही. तसेच रजिस्टर केल्यानंतर उमेदवार आपला ई-मेल आयडी बदलू शकत नाही.

**<u>मुख्यपृष्ठ</u>**

पासवर्ड बदलल्यानंतर उमेदवाराला "मुख्यपृष्ठ" दिसेल.

या पृष्ठावर उमेदवाराला पदासाठी अर्ज केल्यानंतर अर्जाचा तपशिल आणि पैसे भरल्यानंतरची स्थिती याची माहिती मिळेल.

**<u>प्रोफाईल</u>**

या पृष्ठावर उमेदवाराला सर्व माहिती भरल्यानंतर त्याची वैयक्तिक आणि इतर माहिती याचा तपशिल मिळेल.

**<u>अर्ज भरा.</u>**

वैयक्तिक माहिती :- या टप्प्यामध्ये उमेदवाराला उर्वरीत वैयक्तिक माहिती भरणे आवश्यक राहील. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर 'Save (जतन करा.) ' हे बटण क्लिक करा.

इतर माहिती :- या टप्प्यामध्ये उमेदवाराला समांतर आरक्षणाचा प्रकार व परीक्षेसाठी शहर निवडण्याची तरतूद केली आहे. उमेदवाराने नमूद केलेल्या समांतर आरक्षण गटामध्ये मोडत असल्यास योग्य ती माहिती वाचून आपले मत नोंदवावे. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर 'Save (जतन करा.) ' हे बटण क्लिक करा.

**<u>पदे निवडा</u> :- पद, शैक्षणिक पात्रता आणि व्यावसायिक अर्हता नोंदविणे.**

या टप्प्यासाठी अर्जदाराने अर्ज करावयाचे पद, त्याची शैक्षणिक पात्रता आणि व्यावसायिक अर्हता नोंदवावी.

हा टप्पा सुरु करण्यासाठी अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावरील "पद निवड" या लिंकवर क्लिक करावे. पृष्ठावर डाव्या बाजूला पद दिसेल. हे पद निवडल्यावर पृष्ठावर उजव्या बाजूला शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर माहिती भरण्याचे रकाने दिसतील. आपली वयोमर्यादा जर नमूद केलेल्या पदासाठी पात्र नसल्यास आपल्याला तशी माहिती आपल्या पृष्ठावर दाखविण्यात येईल. जर आपण पदासाठी पात्र असल्यास आपणांस आपली संपूर्ण आवश्यक ती माहिती भरणे आवश्यक राहील व संपूर्ण आवश्यक माहिती भरल्यानंतर 'Save (जतन करा.) ' हे बटण क्लिक करा.

**<u>फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करणे.</u>**

या टप्प्यासाठी अर्जदाराचा सध्याचा फोटो व **मराठीतील स्वाक्षरीची** इमेज उपलब्ध असणे आवश्यक आहे.

कार्यपध्दती :-

हा टप्पा सुरु करण्यासाठी अर्जदाराच्या मुर्ख्य पृष्ठावरील "छायाचित्र आणि स्वाक्षरी" या लिंकवर क्लिक करावे.

फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी 'ब्राऊज (Browse)' बटण क्लिक करुन इमेज निवडावी. अपलोडचे बटण क्लिक केल्यानंतर फोटो व स्वाक्षरी या पृष्ठावर दिसेल.

(परवानगी फाईल प्रकार :- jpg, jpeg, png) खयाचित्राची साईज ही १ MB पेक्षा जास्त असू नये. तसेच स्वाक्षरीची साईज ही ५१२ KB पेक्षा जास्त असू नये.

**पुष्टीकरण (Confirmation)**

या टप्प्यामध्ये आपण नमूद केलेली माहिती पून:तपासणीसाठी तरतूद केलेली आहे. जर आपणांस काही बदल करावयाचा असल्यास आपण मागील टॅबवर क्लिक करुन आवश्यक तो बदल करु शकता. आपण नमूद केलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी "पुष्टी करा (Confirm)" या बटणवर क्लिक करावे. "पुष्टी करा (Confirm)" च्या पृष्ठावरील प्रतिज्ञापत्र वाचून ते वाचले असल्याचा चेक बॉक्स टिक (✓)करावा व या पृष्ठावरील "पुष्टी करा (Confirm)" बटणवर क्लिक करावे.

**भरणा**

अर्जा समोरील "भरणा" या दुव्यावर क्लिक करा. तेथे "ऑनलाईन भरणा / चलनाद्वारे भरणा" असे पर्याय दिसतील. चलनाद्वारे भरणा पर्याय निवडल्यास जारी झालेल्या चलनाची प्रिंट घ्या आणि अंतिम दिनांकापुर्वी कामकाजाच्या दिवशी एस.बी.आय. च्या शाखेत शुल्क भरणा करा. २४ तासानंतर अर्जासमोरील भरणा स्थिती "भरणा पुर्ण" म्हणून अद्ययावत होईल. उमेदवार ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी "Internet Banking, Credit Card, Debit Card या पर्यायाचा वापर करु शकतो. ऑनलाईन भरणा केल्यास व्यवहार यशस्वी झाल्यावर लगेचच अद्ययावात होईल.

**बँक चलन प्रिंट करणे.**

बँक चलन प्रिंट करण्याआधी "खात्री (Confirm) चा टप्पा पूर्ण करणे आवश्यक राहील. बँक चलन प्रिंट करण्यासाठी अर्जदाराने मुर्ख्य पृष्ठावरील आपण अर्ज केलेल्या पदासमोर जाऊन पैसे भरण्याची पध्दत या कॉलममधील "ऑफलाईन" या लिंकवर क्लिक करावे व आपले बँक चलन "ए-४" कागदावर प्रिंट करावे. अर्जदाराने चलन निर्मितीनंतर २ दिवसानंतर बँकेत फी जमा करावी. (ऑफलाईन पेमेंटसाठी असणारे बँक चार्जेस हे अर्जदारास भरावे लागतील.)

**स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत शुल्क भरुन ट्रांजॅक्शन आयडी मिळविणे.**

वर नमूद करण्यात आलेल्या चलन प्रतीचा उपयोग करुन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित शुल्क / फी चा भरणा करण्यात यावा. चलनावर निर्धारीत केलेल्या जागेवर बँकेकडून ब्रँचकोड व ट्रांजक्शन आयडी नमूद करुन घ्यावा. शुल्क / फी जमा झाल्याची नोंद महामंडळाकडे आल्यावर आपल्याला शुल्क / फी जमा झाल्याचा SMS व E-mail येईल.

सूचना :-

- ऑफलाईन किंवा ऑनलाईन पैसे भरण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर उमेदवाराने केलेल्या पदासाठी पुष्टी करण्यात येईल. त्यानंतर पदासाठी भरलेली माहिती बदलू शकत नाही.
- अर्ज फी भरल्यानंतर ती परत दिली जाणार नाही.
- वैयक्तिक माहिती "टॅबमधील नाव, वडीलांचे / पतीचे नाव, आडनाव, जन्मदिनांक, ई-मेल आयडी, जात प्रवर्ग" ही माहिती बदलू शकत नाही. तसेच "इतर माहिती" टॅबमधील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, राज्य शासनाचे अंशकालीन कर्मचारी, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, रा.प.कर्मचारी अशा समांतर आरक्षणा बद्दलची माहिती बदलू शकत नाही.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक [क.व औ.स.]**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.**

## चालक पदासाठी आवश्यक असलेला अनुभवाच्या दाखल्याचा नमुना

### विहीत नमुना

### // दाखला //

दिनांक : ---------

स्थळ: -------------- ----

१) मी श्री./श्रीमती. ------------------------------------------------------ (अवजड वाहन मालकाचे संपूर्ण नांव )
मु.पो. -------------------------- ता. ---------------------------- जि. ---------------------- राज्य --------------------

पिनकोड ------------- प्रमाणीत करतो / करते की, श्री.------------------------------(चालक उमेदवाराचे संपूर्ण नांव )

मु.पो. -------------------------- ता. ---------------------------- जि. ----------------------
राज्य --------------------

पिन कोड ------------------ हे माझ्या स्वत:च्या मालकीच्या अवजड (माल वाहतूक ट्रकवर ) वाहन क्रमांक -- -------------

मेक --------- वर दिनांक ------------- ते दिनांक ------------ पर्यंत एकूण ---------------- वर्ष ----- ------ महिने इतक्या कालावधीमध्ये सुरक्षित वाहन चालवून चालक म्हणून काम करीत होते / आहेत. त्याबाबतची माहिती खलीलप्रमाणे.

२)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अवजड वाहन चालविण्याचा परवाना लायसन्स क्रमांक व दिनांक | : | -------------------------------------- -------- |
| २) | लायसन्स मिळाल्याचा दिनांक | : | -------------------------------------- -------- |
| ३) | लायसन्स देणारे आरटीओ कार्यालय | : | -------------------------------------- -------- |
| ४) | अवजड वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्याची तारीख | : | -------------------------------------- -------- |
| ५) | परवाना नुतनीकरणाची तारीख | : | -------------------------------------- -------- |
| ६) | बँज क्रमांक | : | -------------------------------------- -------- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | माझ्याकडे काम करीत असलेल्या कालावधीत त्यांचे हातून झालेल्या अपघातासंबंधीचा तपशील.<br>(**टिप** : अपघात झालेला नसेल तर तसे स्पष्ट नमूद करावे. | : | अ) अपघात कधी झाला ---------------<br>ब) अपघाताचे स्वरुप ---------------<br>मरणांतक ---------------<br>●गंभीर ---------------<br>---<br>●किरकोळ ---------------<br>---<br>क) अपघाताचे कारण ---------------<br>ड) त्याला अपघातासाठी जबाबदार धरण्यात आले होते काय ?---------- |

३) माझ्याकडे चालकाचे काम करीत असताना त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचा नैतिक अध:पतनाचा गुन्हा घडलेला नाही. तसेच, त्यास मद्यपान वा अंमली पदार्थाचे सेवन करण्याचे कोणतेही व्यसन असल्याचे आढळलेले नाही. (असल्यास, त्याप्रमाणे नमूद करावे.)

प्रमाणित करतो की, मी उपरोक्त माहिती पडताळणी व शहानिशा करुन सदरच्या उमेदवाराचा प्रवासी वाहतुकीच्या सेवेत चालक पदासाठी अनुभवाचा दाखला देत आहे.

---------------------------------------- ----------------------------------------

(उमेदवाराची स्वाक्षरी व तारीख ) (अवजड वाहन मालकाची स्वाक्षरी व तारीख )

(ट्रक मालकाने आपल्या नावाचा / पेढीचा रबरी स्टँप उमटवणे आवश्यक आहे.)

४) राजपत्रीत अधिकारी /लोकप्रतिनिधीची शिफारस.

चालक पदासाठीचे वर नमूद केलेले उमेदवार व अवजड वाहन चालविण्याबाबत दाखला देणारे मालक या दोघांनाही मी स्वत: ओळखत असल्यामुळे सदरच्या अनुभव दाखल्याची शिफारस देत आहे.

----------------------------

(राजपत्रित अधिकारी / लोकप्रतिनिधीची स्वाक्षरी व तारीख)

----------------------------

( नांव व हुद्दा )

राहणार ----------------------------------------

तालुका ------------ जिल्हा -------------------

(खासदार /आमदार/जिल्हा परिषद अध्यक्ष/ नगर परिषद अध्यक्ष/ जिल्हा परिषद सदस्य/ राजपत्रीत अधिकारी यापैकी कोणाही एकाची शिफारस चालते.)

************

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना -अ

## अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

**प्रतिज्ञापन**

**नमुना-अ**

**(नियम-४ पहा)**

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------ श्री. ------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/ पत्नी, वय ----------- वर्षे, ----------- महिने रहाणार ------------------------------------------------------------------ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी ------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास,जन्मदिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**उमेदवाराची सही :--**

**ठिकाण :-**

**उमेदवाराचे नांव :--**

**दिनांक :- -----/-----/२०१९**